# मेट्रो ३ मार्गावरील भुयारीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

आरे कॉलनीतील कारडेपोच्या कामाला स्थिगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिल्याने मेट्रो ३ ला दिलासा मिळाला असताना, आता या प्रकल्पासाठी आणखी एक महत्वाची घटना घडली आहे. बुधवारी मेट्रो-३ मार्गावरील भुयारीकरणाचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. तर मुंबई सेंट्रल स्थानकावर ४२ वा आणि प्रकल्पातील अंतिम भुयारीकरणाचा टप्पा पार पडला. या भुयारीकरणास ४३ दिवसांचा कालावधी लागला होता.

---

**● मेट्रो-३ च्या भुयारी मार्गाचे काम १०० टक्के पूर्ण झाले. या क्षणांचे साक्षीदार होताना अतिशय आनंद होत आहे. हा मार्ग मुंबईच्या ऐतिहासिक वारसा इमारती, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारती, सध्याचा मेट्रो मार्ग, रेल्वे मार्ग, नदी व कठीण भौगोलिक रचना असलेला परिसर आदींच्या खालून व अगदी जवळून जात आहे, असे मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या.**

---

मेट्रो-३ मार्गातील सर्वात लांब पट्ट्यांपैकी एक असलेल्या पॅकेज-३ मध्ये मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम, आचार्य अत्रे चौक आणि वरळी या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे. पॅकेज-३ अंतर्गत महालक्ष्मी मेट्रो स्थानक ते मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानकापर्यंतची ८३७ मीटरची सर्वात आव्हानात्मक भुयारीकरणाचे काम रॉबिन्सच्या टीबीएम तानसा-१ ने यशस्वीरित्या पूर्ण केले. मेट्रो-३ या प्रकल्पाचे एकूण ७६.६ टक्के काम पूर्ण झाले आहे.

मेट्रो-३ मार्गावर भुयारीकरणाचे काम करणे खूपच आव्हानात्मक होते, असे मत मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले. तर, आम्ही या प्रकल्पासाठी कामगारांच्या सुरक्षिततेशी तडजोड न करता आधुनिक तंत्रज्ञान वापरले' असे संचालक (प्रकल्प) एस. के. गुप्ता यांनी सांगितले.